महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ अंतर्गत कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी, नागपुर, नागपुर पशुवैद्यक महाविद्यालय, नागपुर आणि पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी -१ , झिल्पा तालुका काटोल, जिल्हा नागपूर ह्यांच्या संयुक्तं विद्यमाने पशुकल्याण पंधरवाड्या निमित्त पशुरोग निदान शिबिराचे आयोजन डॉ. श्वेता लेंडे व डॉ. गजानन अंभोरे विषय विशेषज्ञ, कृषी विज्ञान केंद्र यांनी डॉ सरीपुत लांडगे, वरिष्ठ वैज्ञानिक तथा प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी यांच्या मार्गदर्शनाखाली केले. याप्रसंगी डॉ. राजेंद्र गाडगे यांनी पशुंची रोग तपासणी करून पूरक उपचार केले. विशयतज्ञ डॉ. शीतल चोपडे यांनी पशुपालकांना चारा प्रक्रिया व चारा निर्मितीचे प्रात्यक्षिक, डॉ. श्वेता लेंडे ह्यांनी मूरघास तयार करणे व हिरव्या चाऱ्याचे पशु खाद्यात महत्त्व सांगितले, डॉ. विजय बसूनाथे यांनी पशुपालकांना पशुपालनातील अडचणींवर मात करण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच सदर कार्यक्रमांतर्गत पशुपालकांना पशुपालनाविषयीच्या घडीपत्रिकांचे वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यासाठी डॉ.सीमा राठोड पशुधन विकास अधिकारी यांनी विशेष सहकार्य केले. सदर कार्यक्रमात 45 शेतकऱ्यांनी सहभाग नोंदवला.

तसेच दूध जागृती अभियान अंतर्गत जिल्हा परिषद माध्यमिक तसेच उच्च माध्यमिक शाळा जिल्हा काटोल या ठिकाणी दूध आणि दुग्धजन्य पदार्थांचे महत्त्व तसेच दुधाचे पोषण मूल्य या विषयावर शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. सदर कार्यक्रमात शाळेचे मुख्याध्यापक श्री. गजानन बोंद्रे, शिक्षक वर्ग तसेच 150 विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. या कार्यकर्मांच्या आयोजनासाठी आदरणीय डॉ. अनिल भिकाने सर, संचालक, विस्तार शिक्षण, महाराष्ट्र पशु आणि मत्स्य विज्ञान विद्यापीठ आणि माननीय डॉ. आ पा. सोमकुवर सर, सहयोगी अधिष्ठाता नागपूर पशुवैद्यक महाविद्यालयाचे यांचे मार्गदर्शन लाभले.




महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
कृषि विज्ञान केंद्र, दुधबर्डी
तालुका काळमेश्वर, जिल्हा नागपूर
ICAR
कृषी विज्ञान केंद्र, दुधबर्डी
निकृष्ठ चाऱ्यावर करा
युरिया प्रक्रिया




महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर
कृषि विज्ञान केंद्र
निकृष्ट चाऱ्यावर करा